महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा संयुक्त (पूर्व) परीक्षा - २०२२

**A** → संच क्रमांक

2022 परीक्षा दि. १७ डिसेंबर, २०२२ **Q16**

प्रश्नपुस्तिका क्रमांक 370181
**BOOKLET NO.**

# प्रश्नपुस्तिका
# मराठी, इंग्रजी व सामान्य क्षमता चाचणी

एकूण प्रश्न : 100
वेळ : 1 (एक) तास
एकूण गुण : 200

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा–क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉल्पेनने** लिहावा.

परीक्षा–क्रमांक [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]
↑ केंद्राची संकेताक्षरे — ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा **क्रमांक** उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील."**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम–82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

1. साठी, स्तव, प्रति, इ विभक्ति प्रतिरुपक शब्दयोगी अव्ययी शब्दांचा वापर कोणत्या विभक्तीत केला जातो ?

(1) द्वितीया (2) तृतीया (3) चतुर्थी (4) षष्ठी

---

2. 'कुडास कान, ठेवी ध्यान' या म्हणीचा योग्य अर्थ कोणता ?

(a) नेहमी सावधगिरीने बोलावे.

(b) मागून येऊन वरचढ होणे.

(c) एकाने काम करावे दुसऱ्याने त्याचा फायदा घ्यावा.

(d) साहसाने कार्य करायचे, तर संकटाची भीती बाळगू नये.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (c) बरोबर (2) फक्त (a) बरोबर

(3) फक्त (b) बरोबर (4) फक्त (c) व (d) बरोबर

---

3. 'आमच्या शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांनी येत्या रविवारी वनभोजनास जाण्याचा निश्चय केला आहे'.

वरील वाक्यातील उद्देश्य ओळखा.

(1) वनभोजनास (2) विद्यार्थ्यांनी (3) आमच्या शाळेच्या (4) सर्व

---

4. वाक्यातील नाम किंवा सर्वनाम यांचे क्रियापदाशी जे संबंध असतात त्यांना काय म्हणतात ?

(1) कारकार्थ (2) उपपदार्थ (3) अधिकरण (4) संप्रदान

---

5. 'वरपांगी नको असल्याचे सोंग करून एखादीच्या पाठीमागे लाभ मिळविण्यासाठी जाणे'. या अर्थाची म्हण कोणती ?

(1) नगं नगं म्हणत पायलीच्या मागं पळणं. (2) आगीतून निघावे अन् फुफाट्यात पडावे.

(3) अगं अगं म्हशी मला कुठे नेशी. (4) ओठापर्यंत आले पण पोटात नाही गेले.

---

6. 'जो जे वांछिल तो ते लाहो'. अर्थानुसार या वाक्याचा प्रकार कोणता ?

(1) विध्यर्थी (2) आज्ञार्थी (3) संकेतार्थी (4) विधानार्थी

---



Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

7. 'वाघाच्या घरी शेळी पाहुणी' या म्हणीचा सुसंगत अर्थ व्यक्त करणारा पर्याय निवडा.

(a) पाहुण्यांचा आदरसत्कार करणे ही भारतीय संस्कृती

(b) जाणूनबुजून नाजूकपणा दाखविण्याची वृत्ती

(c) दुर्जनाच्या तावडीत सज्जन

(d) संकटात परिस्थिती पाहून चलाखपणे वर्तन करणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) (d) बरोबर (2) (c) बरोबर (3) (b) बरोबर (4) (a) व (b) बरोबर

---

8. 'शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवावे' या वाक्यातील प्रयोग ओळखा.

(1) कर्मणी प्रयोग (2) भावे प्रयोग (3) संकीर्ण प्रयोग (4) भावकर्तरी प्रयोग

---

9. 'हिरवे हिरवेगार गालिचे' या ओळीतील विशेषणाचा प्रकार पुढीलपैकी कोणता?

(a) गुणवाचक विशेषण (b) क्रमवाचक विशेषण

(c) आवृत्तिवाचक विशेषण (d) गणनावाचक विशेषण

**पर्यायी उत्तरे :**

(1) (b) व (a) बरोबर (2) फक्त (a) बरोबर

(3) फक्त (d) बरोबर (4) यापैकी नाही

---

10. साधित क्रियापदाची पुढीलपैकी दोन उदाहरणे कोणती आहेत?

(a) संपाची तीव्रता आता थंडावली. (b) हमालाला काम करवते.

(c) कामगारांनी काम संपवून टाकले. (d) आईच्या प्रेमास तो आता दुरावला.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (c) (2) फक्त (a) व (d) (3) फक्त (c) व (d) (4) फक्त (a) व (b)

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

**खालील उतारा वाचा व त्यावरील प्र. क्र. 11 ते प्र. क्र. 15 ची उत्तरे द्या :**

आपला समाज हा स्थितिप्रिय असल्याने त्यात परिवर्तनवादी शक्ती थोड्या आहेत, आणि त्यांतही पुन्हा त्या विविध प्रवाह व संघटना यांमधून इतस्तत: विखुरलेल्या आहेत. समाजपरिवर्तनासाठी होणारा संघर्ष हा बहुतांशी विषम स्वरूपाचा असतो. परिवर्तनवादी प्रवाहांचा पक्ष सामाजिक न्यायाचा आहे; मानवाच्या प्रतिष्ठेचा आहे. बाह्य परिस्थिती प्रतिकूल असली तरी काळाचा प्रवाह त्यांना अनुकूल आहे. पण परिवर्तनाला विरोध करणारे प्रस्थापितांचे प्रतिनिधी व प्रवक्ते यांना पैसा, प्रतिष्ठा, दमनयंत्रणा, सामाजिक संस्था व सांस्कृतिक परंपरा यांचे पाठबळ आहे. म्हणून परिवर्तनवादी शक्तींनी आपले सर्व बळ एकवटल्याखेरीज या झगड्यात यश मिळण्याची शक्यता नाही, याचा पदोपदी त्यांना अनुभव येतो. म्हणून प्रत्येक संघटनेचे नेते व कार्यकर्ते अंतर्गत एकात्मतेचा आग्रह धरतात, व्यापक एकजुटीचे वा आघाडीचे स्वागत करतात, पण प्रत्यक्ष वास्तवाकडे नजर टाकली तर अगदी वेगळे चित्र दिसते.

राजकीय पक्ष, श्रमिक संघटना, पुरोगामी सामाजिक संस्था या सर्वांच्या नित्यनैमित्तिक कार्यात एकजुटीचा अभावच दिसून येतो. राजकीय पक्षात वारंवार फूट पडते. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व वाङ्मयीन क्षेत्रांत काम करणाऱ्या संस्था गटबाजीने ग्रासल्या जातात. संसदबाह्य कार्य करणाऱ्या संघटना पाहिल्या तर त्यांच्यातील मतभेद विकोपाला जाऊन त्यांना एकत्र काम करणे अशक्य होऊन बसते. विचारांच्या पातळीवर ऐक्याची ओढ आणि व्यवहारात अलगतावाद, फुटीरपणा आणि दुही यांचे प्राबल्य असा विसंवाद का निर्माण व्हावा, या प्रश्नाची अधिक खोलात जाऊन चर्चा करण्याची आवश्यकता आहे. या फुटीरपणाची कारणमीमांसा करताना प्रथम येथील सामाजिक वास्तवातील गुंतागुंतीची वस्तुनिष्ठ दृष्टीने उकल करावयास हवी. केवळ काही प्रमुख व्यक्ती, पक्ष वा संघटना यांच्यातील दोषांची व उणिवांची चिकित्सा करून या प्रवृत्तीचे उच्चाटन करता येणार नाही. याचा अर्थ असा नाही की, व्यक्तींचे दोष किंवा संघटनेतील उणिवा यांच्यामुळे काही कार्यहानी होत नाही. पण फक्त त्यांच्यावरच लक्ष केंद्रित केले, तर त्यामधून काही हाती लागणार नाही; कारण फुटीरपणाची ही प्रवृत्ती सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रांत पसरलेली आहे. तेव्हा आपल्या सामाजिक वास्तवात अशा काही गोष्टी असल्या पाहिजेत की, ज्यांच्यामुळे फुटीरपणाला खतपाणी मिळते, दुहीची बीजे पेरली जातात. त्यांच्यावर सतत प्रहार करून त्या नष्ट करता आल्या तर एकजूट साधण्याचे कार्य पुष्कळच सोपे होईल.

आज सर्वच ऊठसूठ समग्र क्रांतीची भाषा बोलत असतात. मग परिवर्तनवादी कोण आणि परिवर्तनविरोधी कोण या प्रश्नाचा निर्णय आपल्याला नि:संदिग्धपणे करता आला पाहिजे. शोषित व पददलित लोकसमूहांचे दास्य, दैन्य व दारिद्र्य नष्ट करायचे असेल तर, प्रचलित समाजव्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले पाहिजे; आणि त्यासाठी सर्वसामान्य कष्टकरी जनतेला कधी ना कधी संघटितपणे निर्णायक संघर्ष करावा लागेल अशी ज्यांची धारणा असते, त्या बरोबरच जनतेत अशा जाणिवा व आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी जे सम्यक् दृष्टीने व समर्पणशील वृत्तीने प्रयत्नशील असतात त्यांनाच परिवर्तनवादी म्हणणे उचित होईल. अनेक जाती, जमाती, भाषा, धर्म, पंथ यांनी बनलेल्या भारतासारख्या खंडप्राय देशात सर्वसामान्य लोकांच्या जीवनसरणीत नुसती विविधताच नव्हे, तर फार मोठी विषमताही आहे. त्यांच्यात 'एकात्मता' जोपासणे आवश्यक आहे. त्यासाठी समाज प्रबोधनकर्त्यांनी एकजूट झाले पाहिजे.

---

**11.** उतारा वाचल्यानंतर आपणास खरे 'परिवर्तन विरोधी कोण आहेत' असे वाटते ?

(1) प्रतिगामी विचारांचे लोक

(2) प्रस्थापित लोक

(3) फुटीरतावादी लोक

(4) समग्र क्रांतीची भाषा करणारे लोक

---



Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

12. परिवर्तनवादी संघटनांना अपयश येण्यामागचे अचूक कारण कोणते ?

(1) व्यक्तीगत स्वार्थ (2) इतस्तत: विखुरलेल्या संघटना

(3) व्यक्तींचे दोष किंवा संघटनेतील उणिवा (4) अलगतेची प्रवृत्ती

13. लेखकाच्या मते 'खरा परिवर्तनवादी' कोणाला म्हणावे ?

(1) समन्वयशील वृत्ती असलेला.

(2) सम्यक व समर्पणशील वृत्तीने प्रयत्नशील असलेला.

(3) संघटनशील वृत्तीचा.

(4) एकजूट करण्यात प्रयत्नशील असलेला.

14. परिवर्तनवादी चळवळींमध्ये एकजूट होण्यासाठी अचूक उपाय कोणता ?

(1) विविध चळवळींचे ऐक्य घडवून आणावे.

(2) संघटनात्मक एकजूट दाखवून संघर्ष करावा.

(3) फुटीरतावादी प्रवृत्तीवर सतत प्रहार करून एकजूटीचे महत्व वाढवावे.

(4) पक्ष किंवा संघटना यांच्यातील दोष व उणिवा घालवून चळवळ उभारावी.

15. परिवर्तनवादी संघटनांना यश येण्यासाठी काय उपाय केला पाहिजे ?

(1) परिवर्तनवादी शक्तींची एकजूट झाली पाहिजे.

(2) प्रस्थापितांना विरोध केला पाहिजे.

(3) फुटीरतावाद्यांना सोडून द्यावे.

(4) संघटितपणे संघर्ष करावा.

16. Choose the correct option to fill in the blank.

They decided to __________ and try to be friends again.

(1) Bury the hatchet (2) Bury the sword

(3) Bury the gun (4) Bury the clarion call

17. Choose the most appropriate option from the following to complete the sentence :

She _________ between cheerfulness and deep despair.

(1) Alternates (2) Alternately (3) Alters (4) Alternatively

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

18. He worked hard that he might pass the examination .

Choose the correct simple sentence form of the above sentence.

(1) He worked hard and passed the examination.

(2) He worked hard to pass the examination.

(3) He worked hard so that he could pass the examination.

(4) If you work hard you may pass the examination.

---

19. (a) He is almost correct in his decision.

(b) The house is enough large to accommodate sizeable number of people.

(c) Each boy and each girl is busy with duty.

(d) Neither he nor his friend has prepared their lesson.

Identify the **correct** sentences.

(1) Only (a) and (b) (2) Only (a) and (c)

(3) Only (b) and (c) (4) Only (b) and (d)

---

20. Fill in the blank in the following sentences :

The book just ____________ in my hands.

My whole life had ____________ at the seams.

(1) came round, come round (2) came apart, come apart

(3) came into, come in (4) came by, came around

---

21. Identify the underlined clause in the following sentence :

Hamish asked me how I grow my carrots .

(1) Noun clause (2) Adjective clause

(3) Adverb clause (4) Relative clause

---

22. Nobody is happy with him because he is a black sheep in the society.

Identify the **correct** meaning of the underlined word.

(1) a man with black complexion (2) a very poor man

(3) a man of bad character (4) a man of no importance

---



Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

23. Choose the correct sentence/s :

(a) You mustn't driving fast.

(b) You needn't drive fast.

(c) Don't you have to go to the office at nine every day ?

**Answer Options :**

(1) (a) and (b) only (2) (b) only

(3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

24. Match the pairs.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | First appearance in public | (i) | maiden |
| (b) | A mournful song for the dead | (ii) | highbrow |
| (c) | One who exhibits about his superiority | (iii) | debut |
| (d) | First venture of a person | (iv) | dirge |
| | | (v) | egotist |

**Answer Options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (v) | (ii) |
| (2) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (3) | (i) | (iv) | (ii) | (v) |
| (4) | (i) | (iv) | (v) | (iii) |

---

25. Choose the incorrect passive option/s of the following sentence :

He urged the Council to reduce the rates.

(a) The Council was urged to reduce the rates.

(b) The Council were urged to reduce the rates.

(c) He urged that the rates should be reduced.

(d) He urged the rates to reduced.

**Answer Options :**

(1) (a), (c) (2) (b), (d) (3) Only (d) (4) Only (a)

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

**Read the following passage carefully and answer Q.No's 26 to 30 based on it.**

Happy is the man who acquires the habit of reading when he is young. He has secured a life-long source of pleasure, instruction and inspiration . So long as he has his beloved books, he need never feel lonely. He always has a pleasant occupation of leisure moments, so that he need never feel bored. He is the possessor of wealth more precious than gold. Ruskin calls books, "Kings' Treasures"- treasuries filled, not with gold and silver and precious stones, but with riches much more valuable than these - knowledge, noble thoughts and high ideals. Poor indeed is the man who does not read, and empty is his life.

The blessings which the reading habit confers on its possessor are many.

Provided we choose the right kind of books, reading gives the highest kind of pleasure. Some books we read simply for pleasure and amusement - for example, good novels. And novels and books of imagination must have their place in everybody's reading. When we are tired, or the brain is weary with serious study, it is a healthy recreation to lose ourselves in some absorbing story written by a master hand.

But to read nothing but books of fiction is like eating nothing but cakes and sweetmeats. As we need plain, wholesome food for the body, so we must have serious reading for the mind. And here we can choose according to our taste. There are many noble books on history, biography, philosophy, religion, travel, and science which we ought to read, and which will give us not only pleasure but an education. And we can develop a taste for serious reading, so that in the end it will give us more solid pleasure than even novels and books of fiction.

Nor should poetry be neglected, for the best poetry gives us noble thoughts and beautiful imaginings clothed in lovely and musical language.

Books are the most faithful of friends. Our friends may change, or die; but our books are always patiently waiting to talk to us. They are never cross, peevish, or unwilling to converse, as our friends sometimes are. No wonder a reader becomes a "book-lover."

---

**26.** The attitude of author towards the subject is most probably.

Choose the answer option :

(1) Repulsive (2) Autocratic (3) Suggestive (4) Arrogant

---

**27.** Which of the following statements are not true in the context of the passage :

(a) Book lovers never feel lonely.

(b) Only fiction books provide pleasure.

(c) Habit of reading provides pleasure, inspiration throughout one's life.

(d) Serious reading is necessary for cultivation of mind.

(e) Poetry is compared with cakes and sweetmeats.

Choose the **correct** alternative.

(1) (a), (b), (c) (2) (c), (d), (e) (3) (b), (d) (4) (b), (e)

---



Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

28. According to the author, which of the following statements are correct ?

(a) Reading for only pleasure is desirable.

(b) Poetry should be neglected.

(c) One can choose books according to his or her taste for serious reading.

(d) Reading habit is boon.

(e) Poor are those who do not read.

(f) Books are always willing to converse with us.

Choose the **correct** alternatives :

(1) (a), (b), (e), (f) (2) (c), (d), (e), (f) (3) (b), (c), (e), (f) (4) (d), (c), (b)

---

29. Match the following :

(a) Right kind of books (i) Noble thoughts

(b) Poetry (ii) Kings' Treasures

(c) Ruskin (iii) Pleasure

(d) Books on history (iv) Education

**Answer Options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iii) | (ii) | (iv) |
| (2) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (ii) | (iv) | (iii) | (i) |

---

30. To read nothing but books of fiction is like

Choose the answer option :

(1) Eating plain, wholesome food

(2) Eating only cakes and sweetmeats

(3) Eating nothing but cakes and chocolates

(4) Eating nothing but cakes and fruits

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

31. द्रौपदी मुर्मू, भारताच्या 15 व्या राष्ट्रपतीबाबत पुढील दोन विधाने पहा :

(a) त्या झारखंडच्या राज्यपाल होत्या.

(b) त्या कला शाखेतील पदवीधारक आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) बरोबर
(2) केवळ (b) बरोबर
(3) (a) व (b) दोन्ही विधाने बरोबर
(4) (a) व (b) दोन्ही विधाने चूक

Consider the following two statements about Droupadi Murmu, 15th President of India :

(a) She was a Governor of Jharkhand.

(b) She is a degree holder in Arts faculty.

**Answer Options :**

(1) Only (a) is right
(2) Only (b) is right
(3) Both (a) and (b) are right
(4) Neither (a) nor (b) is right

---

32. ऑगस्ट 2022 पर्यंत, भारतातील किती भाषांना 'अभिजात भाषेचा' दर्जा देण्यात आला आहे ?

(1) 04 (2) 06 (3) 08 (4) 10

As of August 2022, how many languages in India were given the status of a 'Classical language' ?

(1) 04 (2) 06 (3) 08 (4) 10

---

33. 2022 चा साहित्य अकादमीतर्फे देण्यात येणारा बालसाहित्य पुरस्कार मराठीसाठी संगीता बर्वे यांच्या कुठल्या कादंबरीला देण्यात आला ?

(1) रानफुले
(2) गंमत झाली भारी
(3) उजेडाचा गाव
(4) पियुची वही

The 2022 Sahitya Academy - Bal Sahitya Puraskar (Children's Literature Award) for Marathi was awarded to which novel by Sangeeta Barve ?

(1) Ranfule
(2) Gammat Zali Bhari
(3) Ujedacha Gaav
(4) Piyuchi Vahi

---



Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

34. नवी दिल्ली येथे जून 2022 मध्ये 'इंडस्ट्रियल डीकार्बोनायझेशन समीट 2022' चे उद्घाटन कोणी केले?

(1) परराष्ट्र मंत्री

(2) अर्थमंत्री

(3) रस्तेवाहतूक आणि महामार्ग मंत्री

(4) गृहमंत्री

Who inaugurated the 'Industrial Decarbonization Summit 2022' in New Delhi in June 2022 ?

(1) Minister of External Affairs

(2) Finance Minister

(3) Minister for Road Transport and Highways

(4) Minister for Home Affairs

---

35. भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (ISRO) ब्राझीलचा 'ॲमेझॉनिया – 1' हा उपग्रह अवकाशात केव्हा सोडला?

(1) 12 ऑगस्ट 2021 (2) 19 एप्रिल 2021

(3) 28 फेब्रुवारी 2021 (4) 21 फेब्रुवारी 2021

When did the Indian Space Research Organization (ISRO) launch the Brazillian 'Amazonia - 1' satellite into space ?

(1) 12 August 2021 (2) 19 April 2021

(3) 28 February 2021 (4) 21 February 2021

---

36. नुकतेच जून 2022 मध्ये गोव्यात 'नॅशनल म्युझियम ऑफ कस्टम्स अँड जी एस टी' चे उद्घाटन कोणी केले?

(1) प्रमोद सावंत (2) एस श्रीधरन पिल्लई

(3) पंतप्रधान नरेंद्र मोदी (4) निर्मला सितारामन

Recently, in June 2022 who inaugurated the 'National Museum of Customs and GST' in Goa ?

(1) Pramod Sawant (2) S. Sreedharan Pillai

(3) Prime Minister Narendra Modi (4) Nirmala Sitharaman

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

37. मंकीपॉक्स चा पहिला मानवी रुग्ण कधी आणि कोणत्या देशात नोंदवला गेला ?

(1) अंगोला - 2022 (2) इथिओपीया - 2021
(3) नामिबीया - 2022 (4) कांगो लोकशाही प्रजासत्ताक - 1970

When and in which country was the first human case of Monkeypox recorded ?

(1) Angola - 2022 (2) Ethiopia - 2021
(3) Namibia - 2022 (4) Democratic Republic of the Congo - 1970

---

38. दरवर्षी आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिन कधी साजरा केला जातो ?

(1) 1 डिसेंबर (2) 4 डिसेंबर (3) 5 डिसेंबर (4) 10 डिसेंबर

When is the International Volunteer Day observed every year ?

(1) 1, December (2) 4, December (3) 5, December (4) 10, December

---

39. मायग्रेशन ट्रॅकिंग सिस्टम (MTS) ॲप्लिकेशन विकसित करणारे पहिले राज्य कोणते आहे ?

(1) बिहार (2) गुजरात (3) महाराष्ट्र (4) उत्तर प्रदेश

Which is the first state to develop Migration Tracking System (MTS) application ?

(1) Bihar (2) Gujarat (3) Maharashtra (4) Uttar Pradesh

---

40. इ.स. 2021 मध्ये शांततेचे नोबेल पारितोषिक कोणाला मिळाले की ज्यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी प्रयत्न केले ?

(1) अब्दुलरझाक गुरनाह
(2) डेव्हिड कार्ड आणि जोशुआ अँगरिष्ट
(3) मारिया रेसा आणि दिमीत्री मुराटोव्ह
(4) डोनाल्ड ट्रम्प

To whom is the Nobel Peace Prize in 2021 awarded for their efforts to safeguard freedom of expression ?

(1) Abdulrazak Gurnah
(2) David Card and Joshua Angrist
(3) Maria Ressa and Dmitry Muratov
(4) Donald Trump

---

41. खालीलपैकी कोणती समिती निवडणूक सुधारणांसाठी स्थापन केलेली नाही ?

(1) एल.एम. सिंघवी समिती (1986) (2) तारकुंडे समिती (1974)
(3) गोस्वामी समिती (1990) (4) इंद्रजीत गुप्ता समिती (1998)

Which of the following Committee was not formed for election reforms ?

(1) L.M. Singhvi Committee (1986) (2) Tarkunde Committee (1974)
(3) Goswami Committee (1990) (4) Indrajit Gupta Committee (1998)

---



Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

42. राज्यघटनेच्या अकराव्या यादीमध्ये पंचायती राज संस्थांना खालीलपैकी कोणत्या विषयाच्या संदर्भात निर्णय घेण्याचे अधिकार नाहीत ?

(1) सामाजिक वनीकरण व वनशेती, लघुद्योग
(2) ग्रामोद्योग, ग्रामीण घरबांधणी, पिण्याचे पाणी
(3) प्राथमिक व माध्यमिक शाळा, तांत्रिक प्रशिक्षण
(4) उच्च शिक्षण, दूरसंचार, राज्यपरिवहन

In the 11th schedule of the Constitution, Panchayati Raj institutions do not have powers to take decisions regarding which of the following subjects ?

(1) Social forestry and Agro forestry, Small scale industries
(2) Village industry, Rural housing, Drinking water
(3) Primary and Secondary schools, Technical Training
(4) Higher education, Telecommunications, State Transport

---

43. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 नुसार स्थायी समितीत किती नगरसेवकांचा समावेश असेल ?

(1) 15 नगरसेवक (2) 20 नगरसेवक (3) 14 नगरसेवक (4) 16 नगरसेवक

As per Maharashtra Municipal Corporations Act, 1949 the Standing Committee shall consist of :

(1) 15 councillors (2) 20 councillors (3) 14 councillors (4) 16 councillors

---

44. खालीलपैकी कोणता ग्रामपंचायतींचे उत्पन्नाचा स्रोत आहे ?

(1) गावांतून जमा झालेल्या एकूण महसूलाच्या (दहा) 10% ग्रामपंचायतीला मिळतात
(2) घरांवरील कर
(3) ग्रामपंचायत प्राणी, व्यवसाय इत्यादींवर कर लादते
(4) वरील सर्व

Which of the following is income source of Gram Panchayat ?

(1) Gram Panchayat gets 10% of the total revenue collected from the village
(2) House tax
(3) Gram Panchayat imposes tax on animals and professions etc.
(4) All the above

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

45. क्यू एस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकींगच्या 2023 आवृत्तीत भारतातील सर्वोत्तम उच्च शिक्षण संस्था म्हणून कोणती संस्था उदयाला आली ?

(1) आय आय टी मद्रास
(2) आय आय टी बॉम्बे
(3) आय आय एस सी बेंगलुरु
(4) आय आय आय टी बेंगलोर

Which institution emerged as the best higher education institution in India in the 2023 edition of QS World University Ranking ?

(1) IIT Madras
(2) IIT Bombay
(3) IISc Bengaluru
(4) IIIT Bengalore

---

46. खालीलपैकी कोणते राज्याच्या मुख्य सचिवांचे कार्य नाही ?

(a) संपूर्ण सचिवालयावर नियंत्रण ठेवणे.
(b) प्रशासनाशी संबंधित सर्व बाबींवर मुख्यमंत्र्यांना सल्ला देणे.
(c) राज्यसरकारचा प्रवक्ता म्हणून काम करणे.
(d) राज्याच्या कारभाराबाबत केंद्रीय गृहमंत्र्यांना अहवाल देणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b)
(2) फक्त (c) आणि (d)
(3) फक्त (d)
(4) फक्त (c)

Which of the following is not a function of the Chief Secretary of State ?

(a) To exercise control over the whole Secretariat.
(b) To advise the Chief Minister on all matters related to administration.
(c) To act as a spokesperson of the State Government.
(d) To report to Union Home Minister regarding affairs of the State.

**Answer Options :**

(1) Only (a) and (b)
(2) Only (c) and (d)
(3) Only (d)
(4) Only (c)

---



Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

47. खालीलपैकी कोणाला भारतातील 'स्थानिक स्वराज्य संस्थेचे जनक' म्हणून ओळखले जाते ?

(1) लॉर्ड रिपन (2) लाल बहादूर शास्त्री

(3) महात्मा गांधी (4) लॉर्ड माऊंटबॅटन

Among the following who is known as 'father of Local-Self Government' in India ?

(1) Lord Ripon (2) Lal Bahadur Shastri

(3) Mahatma Gandhi (4) Lord Mountbatten

---

48. खालीलपैकी कोणते कार्य भारतीय राज्यघटनेच्या बाराव्या अनुसूचीमध्ये सूचीबद्ध नगरपालिकांच्या कार्यांपैकी नाही ?

(1) अपंग आणि मतिमंद यांच्यासह समाजातील दुर्बल घटकांच्या हिताचे रक्षण करणे

(2) शहरी वनीकरण, पर्यावरणाचे संरक्षण आणि पर्यावरणीय पैलूंना प्रोत्साहन

(3) आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी नियोजन

(4) यापैकी नाही

Which of the following functions is not among the functions of municipalities listed in the $12^{th}$ schedule of the Constitution of India ?

(1) Safeguarding the interests of the weaker sections of society, including the handicapped and mentally retarded

(2) Urban forestry, Protection of environment and promotion of ecological aspects

(3) Planning for Economic and Social Development

(4) None of these

---

49. 73 वी घटनादुरुस्ती खालीलपैकी कोणत्या भारतीय राज्यांना लागू होत नाही ?

(a) मेघालय (b) गोवा

(c) मिझोरम (d) हिमाचल प्रदेश

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) (2) (c) आणि (d) (3) (a) आणि (c) (4) (b) आणि (d)

$73^{rd}$ Constitutional Amendment does not apply to which of the following Indian states ?

(a) Meghalaya (b) Goa

(c) Mizoram (d) Himachal Pradesh

**Answer Options :**

(1) (a) and (b) (2) (c) and (d) (3) (a) and (c) (4) (b) and (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

50. राष्ट्रीय महिला आयोगाची निर्मिती ________ करण्यात आली.

(1) भारताच्या संविधानातील दुरुस्तीने

(2) भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयाने

(3) भारतीय संसदेने संमत केलेल्या कायद्याने

(4) भारताच्या राष्ट्रपतींच्या आदेशाने

The National Commission for Women was created with ________ .

(1) an amendment in the Constitution of India

(2) a decision of the Union Cabinet of India

(3) an act passed by the Parliament of India

(4) an order of the President of India

---

51. हायड्रोजन अणूची आयोनायझेशन ऊर्जा किती असते ?

(1) 786 eV (2) 13.6 eV (3) 0 eV (4) 1 MeV

How much is the ionisation energy of the Hydrogen atom ?

(1) 786 eV (2) 13.6 eV (3) 0 eV (4) 1 MeV

---

52. खालीलपैकी कोणत्या प्रक्रियेमुळे पांढऱ्या प्रकाशाचे त्याच्या घटक रंगात विभाजन होते जेंव्हा ते लोलकामधून बाहेर पडतात ?

(1) प्रकाशाचे परावर्तन (2) टोटल इंटर्नल रिफ्लेक्शन

(3) डिस्पर्शन (4) प्रकाशाचे अपवर्तन

Due to which of the following process white light get separated into its constituent colors when passing through a prism ?

(1) Reflection of light (2) Total internal reflection

(3) Dispersion (4) Refraction of light

---

53. अल्फा क्षयामध्ये अस्थिर न्यूक्लिअस, अल्फा कण उत्सर्जित करतो, ज्यामुळे त्याचे प्रोटॉन आणि न्यूट्रॉन ________ ने कमी होते.

(1) प्रोटॉन 2 ने आणि न्यूट्रॉन 2 ने (2) प्रोटॉन 1 ने आणि न्यूट्रॉन 2 ने

(3) प्रोटॉन 2 ने आणि न्यूट्रॉन 1 ने (4) प्रोटॉन 1 ने आणि न्यूट्रॉन 1 ने

In alpha decay, the unstable nucleus emits an alpha particle reducing its proton and neutron by :

(1) Z by 2 and N by 2 (2) Z by 1 and N by 2

(3) Z by 2 and N by 1 (4) Z by 1 and N by 1

---



Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

54. खालीलपैकी कोणत्या अणूमध्ये न्यूट्रॉन नसतो ?

(1) ड्युटेरिअम (2) हायड्रोजन (3) ट्रिटीयम (4) हेलियम

Which atom does not contain neutron ?

(1) Deuterium (2) Hydrogen (3) Tritium (4) Helium

---

55. $NH_3$ ने संतृप्त आहे अशा NaCl च्या संहत द्रावणातून $CO_2$ पाठविला असता ________ चे स्फटिक वेगळे होतात.

(1) $NaHCO_3$ (2) $Na_2CO_3$ (3) $NH_4Cl$ (4) $(NH_4)_2CO_3$

When $CO_2$ is passed into a concentrated solution of NaCl which is saturated with $NH_3$, Crystals of ________ separate out.

(1) $NaHCO_3$ (2) $Na_2CO_3$ (3) $NH_4Cl$ (4) $(NH_4)_2CO_3$

---

56. खालीलपैकी कोण अष्टकाचा नियम पाळत नाही ?

(1) $BeCl_2$ (2) $PCl_5$ (3) $BCl_3$ (4) वरीलपैकी सर्व

Which of the following does not obey octet rule ?

(1) $BeCl_2$ (2) $PCl_5$ (3) $BCl_3$ (4) All of the above

---

57. वनक्षेत्राचे आरेखन (digitalization) करण्यासाठी ________ घटकाचा वापर करतात.

(1) बिंदू (2) रेषा (3) बहुभुजाकृती (4) वरील सर्व

________ element is used for digitalization of forest area.

(1) Point (2) Line (3) Polygon (4) Above all

---

58. शॉर्टरेंज नेटवर्क यास ________ असे म्हणतात.

(1) ब्लूटूथ (2) संगणक (3) मोबाईल (4) प्रिन्टर

Short-range Network is called ________.

(1) Bluetooth (2) Computer (3) Mobile (4) Printer

---

59. भारतात हवाई छायाचित्रणाची सुरवात ________ साली झाली.

(1) 1920 (2) 1921 (3) 1951 (4) 1971

In India aerial photography started in ________ year.

(1) 1920 (2) 1921 (3) 1951 (4) 1971

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

60. इलेक्ट्रॉनिक रेकॉर्डचे प्रमाणीकरण हे __________ आणि हॅश फंक्शनच्या वापराद्वारे केले जाईल, जे सुरुवातीच्या इलेक्ट्रॉनिक रेकॉर्डला दुसऱ्या इलेक्ट्रॉनिक रेकॉर्डमध्ये आच्छादित आणि रुपांतरित करते.

(1) डिजिटल सिग्नेचर (2) असिमेट्रीक क्रिप्टो सिस्टीम

(3) क्रिप्टोग्राफी (4) क्रिप्टोफंक्शन

The Authentication of the electronic record shall be effected by the use of __________ and hash function which envelop and transform the initial electronic record into another electronic record.

(1) Digital Signature (2) Asymmetric Crypto System

(3) Cryptography (4) Crypto Function

---

61. माल्वेअर वर्गीकृत करण्याचे प्रकार ______.

(a) विषाणु आणि वर्म्स (b) ट्रोजन हॉर्स्स (c) स्पायवेअर (d) सॉफ्टकॉन

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (c) (2) (b) आणि (c)

(3) (a), (b) आणि (c) (4) (d) फक्त

Malware can be classified as :

(a) Viruses and Worms (b) Trojan Horses (c) Spyware (d) Softcon

**Answer Options :**

(1) (a) and (c) (2) (b) and (c)

(3) (a), (b) and (c) (4) (d) only

---



Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

62. संगणक हार्डवेअर नियंत्रित करणारे __________ हे सॉफ्टवेअर आहे.

(1) केबल (2) ऑपरेटिंग सिस्टीम

(3) कोबोल (4) कंपायलर

The software that controls computer hardware is __________.

(1) Cable (2) Operating System

(3) COBOL (4) Compiler

---

63. सायबर गुन्ह्यांत __________ सारख्या क्रियाप्रकारांचा समावेश होतो.

(a) चाइल्ड पोर्नोग्राफी (b) क्रेडीट कार्ड फसवणूक

(c) दुसऱ्या व्यक्तिची ऑनलाईन बदनामी करणे (d) संगणक प्रणालीमध्ये अनधिकृत प्रवेश मिळवणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) (2) (c) आणि (d)

(3) (a), (b) आणि (d) (4) वरील सर्व

Cyber Crime involves activities such as __________.

(a) Child pornography (b) Credit Card Fraud

(c) Defaming another person online (d) Gaining unauthorized access to computer Systems

**Answer Options :**

(1) (a) and (b) only (2) (c) and (d) only

(3) (a), (b) and (d) only (4) All of the above

---

64. महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वत रांगेत खालीलपैकी कोणत्या प्रकारचे वस्तीचे प्रारूप आढळते ?

(1) त्रिकोणी प्रारूप (2) रेषाकृती प्रारूप

(3) ताराकृती प्रारूप (4) पायऱ्या पायऱ्याचे प्रारूप

Which kind of settlement pattern is found in Sahyadri ranges of Maharashtra ?

(1) Triangles pattern (2) Linear pattern

(3) Star pattern (4) Step pattern

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

65. भारताच्या शेजारी राष्ट्रांची संख्या किती आहे?

(1) 7 (2) 6 (3) 8 (4) 9

India is having how many neighbouring countries ?

(1) 7 (2) 6 (3) 8 (4) 9

---

66. तापी जलप्रणालीची लांबी किती आहे?

(1) 540 किमी (2) 762 किमी (3) 900 किमी (4) 724 किमी

The total length of Tapi River is :

(1) 540 km (2) 762 km (3) 900 km (4) 724 km

---

67. हिमाचल प्रदेशातील भाक्रा हे धरण कोणत्या नदीवर बांधण्यात आले आहे?

(1) सतलज (2) रावी (3) चिनाब (4) बियास

In Himachal Pradesh the Bhakra dam built on which river ?

(1) Sutlej (2) Ravi (3) Chenab (4) Beas

---

68. भिमा आणि गोदावरी नद्यांच्या दरम्यान __________ डोंगर रांग स्थित आहे.

(1) महादेव डोंगर (2) सातमाळा-अजंठा

(3) हरिशचंद्र बालाघाट (4) सातपुडा

__________ hill is situated between Bhima river and Godavari river.

(1) Mahadev hill (2) Satmala - Ajentha

(3) Harishchandra Balaghat (4) Satpuda

---



Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

69. अंगारा भूमी आणि गोंडवाना भूमी यांच्या दरम्यान कोणता समुद्र होता ?

(1) पॅसिफिक समुद्र (2) लाल समुद्र (3) अटलांटिक समुद्र (4) टेथिस समुद्र

Which ocean was located between Angara and Gondawana land ?

(1) Pacific ocean (2) Red sea (3) Atlantic ocean (4) Tethys sea

---

70. __________ हे दक्षिण कोकणातील जास्त पावसाचे ठिकाण आहे.

(1) इगतपुरी (2) माथेरान (3) आंबोली (4) महाबळेश्वर

__________ is a heavy rainfall place in south Konkan.

(1) Igatpuri (2) Matheran (3) Amboli (4) Mahabaleshwar

---

71. दिलेल्या संख्या शंकूतील ताऱ्याच्या ठिकाणी येणारी संख्या शोधा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 19 | 43 | 37 | 26 | 39 |
| 24 | 6 | 11 | 13 | |
| 30 | 17 | 24 | | |
| 13 | 7 | | | |
| ✡ | | | | |

(1) 18 (2) 6 (3) 16 (4) 20

Find the number at the place of star, in given number pyramid.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 19 | 43 | 37 | 26 | 39 |
| 24 | 6 | 11 | 13 | |
| 30 | 17 | 24 | | |
| 13 | 7 | | | |
| ✡ | | | | |

(1) 18 (2) 6 (3) 16 (4) 20

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

72. खालील दिलेल्या आकृतीत आयत महिला दर्शवितो, त्रिकोण शिक्षित दर्शवितो, वर्तुळ ग्रामीण दर्शवितो आणि चौकोन स्वयंरोजगार दर्शवितो; तर खालीलपैकी कोण अशिक्षित स्वयंरोजगारीत ग्रामीण महिला आहे ?




(1) 4 (2) 18 (3) 5 (4) 3

In the following diagram, rectangle represents females, triangle represents educated, circle represents rural and square represents self employed. Who among the following is uneducated self employed rural female ?




(1) 4 (2) 18 (3) 5 (4) 3



Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

73. परीला शाळेतून एक प्रोजेक्ट मिळाला. त्यात तिला विद्यार्थ्यांना आवडणाऱ्या विषयाबद्दल माहिती जमा करावयाची होती. तीने 800 विद्यार्थ्यांकडून माहिती जमा केली तर मराठी विषय आवडणारे किती विद्यार्थी आहेत ?




(1) 4 (2) 32 (3) 1440 (4) 40

Pari got a project from her school. In which she has to collect the information regarding favourite subjects of the students. She collected data from total 800 students. How many students like Marathi subject ?




(1) 4 (2) 32 (3) 1440 (4) 40

---

74. विनयला आठवते की त्याच्या आईचा वाढदिवस 26 ऑगस्ट च्या नंतर परंतु 29 ऑगस्ट च्या आत आहे. तर त्याच्या भावाला विकासला आठवते की आईचा वाढदिवस 27 ऑगस्टच्या नंतर परंतु 30 ऑगस्टच्या आत आहे. तर त्यांच्या आईचा वाढदिवस कोणत्या दिवशी असतो ?

(1) 26 ऑगस्ट (2) 27 ऑगस्ट (3) 28 ऑगस्ट (4) 30 ऑगस्ट

Vinay remembered that his mother's birthday is after 26 August but before 29th August. While his brother Vikas remembered that his mother's birthday is after 27th August but before 30th August. What is the birth date of their mother ?

(1) 26 August (2) 27 August (3) 28 August (4) 30 August

---

75. प्रश्न चिन्हाच्या ठिकाणी योग्य संकल्पना ओळखा –

FVJ : HXD : : ___?___ : TWP

(1) BTW (2) DYV (3) NUR (4) JVF

Find out the proper term at the place of question mark.

FVJ : HXD : : ___?___ : TWP

(1) BTW (2) DYV (3) NUR (4) JVF

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

76. प्रश्न चिन्हाच्या ठिकाणी योग्य संख्या शोधा :




(1) 81 (2) 72 (3) 53 (4) 01

Find out the number for question mark :




(1) 81 (2) 72 (3) 53 (4) 01

---

77. मोकळ्या जागेतील योग्य संख्या शोधा :




(1) 4 2 3 (2) 3 2 2 (3) 6 4 3 (4) 2 4 6

Find out the correct number for empty space :




(1) 4 2 3 (2) 3 2 2 (3) 6 4 3 (4) 2 4 6

---

78. प्रश्न चिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?

31, 15, 6, ___?___, 1

(1) 7 (2) 4 (3) 2 (4) 1

Which number will replace question mark in the series ?

31, 15, 6, ___?___, 1

(1) 7 (2) 4 (3) 2 (4) 1

---



Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

79. जर 8×2 = 4, 8×4 = 2, 16×8 = 2 तर 40×5 = ?

(1) 2 (2) 8 (3) 20 (4) 10

If 8×2 = 4, 8×4 = 2, 16×8 = 2 then 40×5 = ?

(1) 2 (2) 8 (3) 20 (4) 10

80. बँकेतील भरतीसाठी 20 प्रश्नांची एक परीक्षा घेण्यात आली. त्या परीक्षेत प्रत्येक बरोबर येणाऱ्या उत्तरासाठी 5 गुण मिळतात तर प्रत्येक चुकलेल्या उत्तरासाठी 2 गुण कमी होतात. स्पंदनला त्या परीक्षेत फक्त 10 प्रश्न बरोबर सोडविता आले तर त्याला किती गुण मिळतील ?

(1) 20 (2) 30 (3) 40 (4) 50

An examination of 20 questions is taken for Bank recruitment. 5 marks are awarded for the correct answer and 2 marks are deducted for the wrong answer. Spandan has solved 10 questions correctly in that examination, then what will be his score in examination ?

(1) 20 (2) 30 (3) 40 (4) 50

81. दोन संख्यांची बेरीज 50 आहे. त्यांच्यातील फरक 22 आहे, तर त्यातील लहान संख्या कोणती ?

(1) 28 (2) 14 (3) 05 (4) 30

If the sum of two number is 50 and their difference is 22, then the smaller number is ?

(1) 28 (2) 14 (3) 05 (4) 30

82. एका गटात A, B, C, D आणि E अश्या पाच व्यक्ती आहेत. त्यात B, C चा भाऊ आहे. या 5 व्यक्तीत एक जोडपे आहे. E हा नवरा आहे. A आणि D मैत्रीणी आहेत आणि त्यांनी लग्न केलेले नाही. तर E ची बायको कोण ?

(1) B (2) C (3) D (4) A

In a group there are five persons. A, B, C, D and E. B is the brother of C. In these five people there is one couple. E is the husband. A and D are female friends and they are unmarried. Who is a wife of 'E' ?

(1) B (2) C (3) D (4) A

83. जर खालील संख्यात्मक माहितीचा मध्यमान 6 असेल तर खालील माहितीतील 'P' ची किंमत किती असेल ?

| X | 2 | 4 | 6 | 10 | P+5 |
|---|---|---|---|---|---|
| f | 3 | 2 | 3 | 1 | 2 |

(1) 66 (2) 14 (3) 07 (4) 03

If mean of the following data is 6. Then find out the value of P :

| X | 2 | 4 | 6 | 10 | P+5 |
|---|---|---|---|---|---|
| f | 3 | 2 | 3 | 1 | 2 |

(1) 66 (2) 14 (3) 07 (4) 03

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

84. सकाळी नीलम सूर्याच्या दिशेने चालायला सुरुवात करते आणि 8 किमी चालते. ती 90° च्या कोनात डावीकडे वळते आणि सरळ 12 किमी चालते आणि पुन्हा 90° च्या कोनात उजवीकडे वळते आणि 8 किमी जाते. तर ती सुरुवातीच्या स्थळापासून किती अंतर दूर आहे आणि कोणत्या दिशेला आहे ?

(1) 28 किमी पूर्वेला (2) 18 किमी ईशान्यकडे
(3) 20 किमी ईशान्यकडे (4) 20 किमी पूर्वेकडे

In the morning Neelam starts to walk towards the Sun and walks 8 km. She turns left at 90° and goes 12 km, and then again turns right at 90° and goes 8 km. How far and in which direction is she from her starting point ?

(1) 28 km, East (2) 18 km, North-East
(3) 20 km, North-East (4) 20 km, East

---

85. 73 विद्यार्थी असलेल्या वर्गातील काही विद्यार्थी केवळ गिटार आणि काही केवळ बासरी वाजवू शकतात. अकरा विद्यार्थी गिटार आणि बासरी दोन्ही वाजवू शकतात. जर गिटार वाजवू शकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या 31 असेल तर केवळ बासरी वाजवू शकणाऱ्या व केवळ गिटार वाजवू शकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या किती ?

(1) 43 व 21 (2) 42 व 21 (3) 42 व 22 (4) 42 व 20

In a class of 73 students, some students can play only Guitar & some can play only Flute. Eleven students can play both Guitar & Flute. If the Number of students who can play Guitar is 31. Then how many students can play only Flute & how many can only play Guitar ?

(1) 43 and 21 (2) 42 and 21 (3) 42 and 22 (4) 42 and 20

---

86. गाळलेल्या जागेतील संज्ञा शोधा.

X 11, V 13, S 17, O 23, ______.

(1) K 25 (2) I 27 (3) J 31 (4) F 32

Find out the next missing term.

X 11, V 13, S 17, O 23, ______.

(1) K 25 (2) I 27 (3) J 31 (4) F 32

---

87. गाळलेल्या जागी योग्य शब्द शोधा.

CX, FU, IR, ______, OL

(1) LO (2) OM (3) MP (4) OO

Find out the missing term.

CX, FU, IR, ______, OL

(1) LO (2) OM (3) MP (4) OO

---



Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

88. रिकाम्या जागेतील अंक शोधा :




(1) 19 (2) 80 (3) 33 (4) 116

Find out the missing number :




(1) 19 (2) 80 (3) 33 (4) 116

---

89. एका पिशवीत 10 पांढरे, 16 लाल आणि 14 काळे चेंडू आहेत. जर यादृच्छिकपणे एक चेंडू त्यातून काढण्यात आला तर लाल किंवा काळा चेंडू निघण्याची किती शक्यता आहे ?

(1) $\frac{1}{1}$ (2) $\frac{3}{4}$ (3) $\frac{7}{3}$ (4) $\frac{2}{40}$

A bag contains 10 white, 16 red and 14 black balls. A ball is drawn randomly from it, then the probability of drawing a red or black ball is ?

(1) $\frac{1}{1}$ (2) $\frac{3}{4}$ (3) $\frac{7}{3}$ (4) $\frac{2}{40}$

---

90. योग्य गणितीय चिन्हांचा उपयोग करून खालील समीकरण बरोबर करा :

42 ☐ 6 ☐ 51 = 201

(1) + आणि − (2) × आणि − (3) − आणि ÷ (4) ÷ आणि ×

Use proper mathematical signs to make the equation correct :

42 ☐ 6 ☐ 51 = 201

(1) + and − (2) × and − (3) − and ÷ (4) ÷ and ×

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

91. योग्य निष्कर्ष निवडा :

**विधान :** औरंगाबाद ते चेन्नई प्रवास हवाई मार्गाने जलद होतो.

**निष्कर्ष :** (a) औरंगाबाद आणि चेन्नई ही ठिकाणे हवाई मार्गाने जोडलेली आहे.

(b) औरंगाबाद ते चेन्नईसाठी दुसरा कोणताही दळण-वळणाचा मार्ग उपलब्ध नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) हा निष्कर्ष योग्य आहे. (2) फक्त (b) हा निष्कर्ष योग्य आहे.

(3) दोन्ही (a) आणि (b) निष्कर्ष योग्य आहे. (4) दोन्ही (a) आणि (b) निष्कर्ष योग्य नाही.

Choose proper conclusion :

**Statement :** It is faster to travel by air from Aurangabad to Chennai.

**Conclusion :** (a) Aurangabad and Chennai are connected by air services.

(b) There is no other means of transportation between Aurangabad to Chennai.

**Answer Options :**

(1) Only conclusion (a) is implicit. (2) Only conclusion (b) is implicit.

(3) Both (a) and (b) are implicit. (4) Neither (a) or (b) are implicit.

---

92. संजयपेक्षा नितीन 3 वर्षांनी मोठा आहे. संजयचे वय किरण च्या वयाच्या दुप्पट आहे. जर त्यांच्या तिघांच्या वयांची एकूण बेरीज 103 आहे. तर नितीन किती वर्षाचा आहे ?

(1) 20 (2) 34 (3) 40 (4) 43

Nitin is 3 year older than Sanjay, who is twice as old as Kiran. If the sum of total age of all three is 103, then how old is Nitin ?

(1) 20 (2) 34 (3) 40 (4) 43

---

93. शाळेत येण्यासाठी विद्यार्थी खालील दळणवळणाचा उपयोग करीत असतील आणि ही माहिती जर पाई चार्ट द्वारा दाखवण्यात आली तर शाळेत पायी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी किती अंशाचा कोन तयार होईल ?

| शाळेत येण्यासाठी वापरले जाणारे साधन | पायी | गाडी | सायकल | बस | रिक्षा |
|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी संख्या | 6 | 4 | 7 | 8 | 5 |

(1) 6° (2) 30° (3) 72° (4) 80°

The students are using following transportation for school and if this information is shown in a Pie-chart then how many degree's angle will be made for students who are coming by walking ?

| Means for transportation | Walk | Car | Cycle | Bus | Auto |
|---|---|---|---|---|---|
| No. of Students | 6 | 4 | 7 | 8 | 5 |

(1) 6° (2) 30° (3) 72° (4) 80°

---



Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

94. रिकाम्या जागेसाठी योग्य अंक शोधा.

27, 32, ______, 54, 71, 92

(1) 37 (2) 41 (3) 51 (4) 52

Find out the missing number.

27, 32, ______, 54, 71, 92

(1) 37 (2) 41 (3) 51 (4) 52

95. मुलीचे वय 16 वर्षे आहे आणि मुलगी ही आई-वडीलांच्या लग्नानंतर 1 वर्षांनी जन्मलेली आहे. जर आई वडीलांच्या वयांची बेरीज आणि लग्नाच्या वर्षाची बेरीज 116 आहे. आईचे वय वडीलांच्या वयापेक्षा 3 वर्षांनी कमी असेल तर वडीलांचे वय किती आहे?

(1) 56 वर्षे 6 महिने (2) 51 वर्षे

(3) 48 वर्षे (4) 99 वर्षे

A daughter is 16 years of age, who was born after one year of parent's marriage. The sum of total age of parents and their marriage is 116 years. Mother is 3 year younger than father, then what is the age of father ?

(1) 56 years 6 months (2) 51 years

(3) 48 years (4) 99 years

96. कोसी नदीच्या पात्र बदलामुळे खालीलपैकी कोणत्या राज्यातील सर्वाधिक जिल्ह्यांना नेहमी पुराचा तडाखा बसतो?

(1) झारखंड (2) बिहार आणि उत्तर प्रदेश

(3) बिहार (4) उत्तर प्रदेश

Majority districts of which state are affected by the floods due to change in the course of river Kosi ?

(1) Jharkhand (2) Bihar and Uttar Pradesh

(3) Bihar (4) Uttar Pradesh

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

97. वातावरणात ओझोन वायूचे प्रमाण _________ टक्के आढळते.

(1) 0.00006 (2) 0.00005 (3) 0.00007 (4) 0.000006

In the atmosphere ozone gas is found in _________ percent.

(1) 0.00006 (2) 0.00005 (3) 0.00007 (4) 0.000006

---

98. _________ हि मानवनिर्मित आपत्ती आहे.

(1) पूर (2) भूस्खलन (3) दुष्काळ (4) औद्योगिक अपघात

_________ is a manmade hazard.

(1) Floods (2) Landslide (3) Famine (4) Industrial accident

---

99. खालीलपैकी कोणते जैवविविधता स्थळ नाही ?

(1) पश्चिम घाट (2) पूर्व हिमालय

(3) अंदमान निकोबार बेटे (4) पूर्व घाट

Which of the following is not a biodiversity hotspots ?

(1) Western Ghat (2) Eastern Himalaya

(3) Andaman - Nicobar Islands (4) Eastern Ghat

---

100. आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण विषयक पहिली जागतिक परिषद 5 जून 1972 रोजी कोणत्या शहरात संपन्न झाली ?

(1) स्टॉकहोम (2) न्युयॉर्क (3) लंडन (4) बर्मिंगहॅम

In which of the following city the first "International Environmental Conference" was held on 5th June 1972 ?

(1) Stockholm (2) New York (3) London (4) Birmingham

---

-oOo-

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

**सूचना** – (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम–82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वतःबरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग–1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्र. क्र. 201.** सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलतः प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर–क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र. क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर–क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

SEAL

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com